जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील जिल्हा योजनांतर्गत योजनाच्या आराखड्यामध्ये कार्यालयीन/ निवासी इमारतीच्या बांधकामास जिल्हा नियोजन मंडळामार्फत प्रशासकीय मान्यता घेणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्र. बीडीजी-२०१६/प्र.क्र.१७२/इमा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ०१ एप्रिल, २०२६

**वाचा :-** १) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक : जिवायो-१००७/ प्र.क्र.३९/का-१४४४, दिनांक १६.०२.२००८

२) शासनपत्र नियोजन विभाग पत्र क्रमांक जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१, दिनांक ३०.१२.२००९

३) शासनपत्र नियोजन विभाग क्र.डिएपी-१०१५/प्र.क्र.३०४/का.१४८१, दिनांक १६.१२.२०१५

४) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.डिएपी-१०१६/प्र.क्र.४७/ का-१४८१, दिनांक १९.०३.२०२६

५) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १९.०९.२०१६.

**प्रस्तावना :-**

दिनांक १९.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, जिल्हा नियोजन व विकास मंडळांतर्गत खालील प्रकारच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करुन ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात यावीत, अशा सूचना देण्यात आल्या होत्या :-

१) सर्व शासकीय विभागांच्या कार्यालयीन/ निवासी इमारतीची लहान मूळ बांधकामे (Miner Original Works) यांचा समावेश करण्यात यावा.

२) संबंधित उपभोक्ता विभागाच्या मागणीप्रमाणे शासकीय कार्यालयीन/ निवासी इमारतीची नियमानुसार अनुज्ञेय मोठी मूळ बांधकामे (Major Original Works).

३) कार्यालयीन निवासी इमारतीसंबंधी आवश्यक अनुज्ञेय अनुषंगिक कामे जसे की, इमारतीभोवती संरक्षक भिंत, अंतर्गत रस्ते, अस्तित्वातील इमारतीचे विस्तारीकरण, विद्युतीकरण इत्यादी इमारत बांधकामे.

४) राज्यस्तरावर मंजूरी दिलेल्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या अत्यंत आवश्यक अशी अंतर्गत उपकामे उदा. प्रशासकीय इमारतीमधील फर्निचर काम, प्रशासकीय इमारतीची उर्वरीत आवश्यक बांधकामे, विद्युतीकरण इत्यादी कामे.

५) जिल्हा नियोजन मंडळांतर्गत प्रस्तावित कामे ही दोन आर्थिक वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

तथापि, “सार्वजनिक बांधकाम शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१६ मध्ये “पंचायत समितीचे केवळ प्रशासकीय इमारत बांधकाम (देखभाल, दुरुस्ती व नुतनीकरण वगळून)” या कामाचा समावेश करण्याबाबत तसेच या कामाकरीता “जिल्हा परिषद बांधकाम विभाग” ही कार्यान्वयीन यंत्रणा राहील, अशी सुधारणा उपरोक्त शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१६ मध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१६ मध्ये “पंचायत समितीचे केवळ प्रशासकीय इमारत बांधकाम (देखभाल, दुरुस्ती व नुतनीकरण वगळून)” या कामाचा समावेश करण्याबाबत तसेच या कामाकरीता “जिल्हा परिषद बांधकाम विभाग” ही कार्यान्वीन यंत्रणा राहील, अशी सुधारणा करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०११२२२१४७९१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Niranjan
Arvind Telang

Digitally signed by Niranjan Arvind Telang
DN: c=IN, o=Personal, title=9063,
pseudonym=fa4b8476c77948b693f961d63c7a579b,
2.5.4.20=c23337809ef4fbba9fe0c6544de18cd588bff051f9ed
ff556c58b122e0d65776, postalCode=411007,
st=Maharashtra,
serialNumber=8a19090f62fa3b97329b76be28b7acce089086
6861a242bdcb38db4a1d1ce2ea, cn=Niranjan Arvind Telang
Date: 2026.04.01 15:30:57 +05'30'

**( निरंजन तेलंग )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव सचिव,
३. मा.मुख्य सचिव,
४. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.सचिव तथा विकास आयुक्त, नियोजन विभाग,
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
७. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
८. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
९. निवडनस्ती (कार्यासन इमारती-१).